लोकमत

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन वर्ग

# वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी दूरशिक्षण केंद्राने नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबविले पाहिजेत. त्यासाठी शिक्षकांनी सेवावृत्ती ठेवून दर्जेदार अभ्यासक्रमांद्वारे जास्तीत जास्त विद्यार्थी दूरशिक्षण केंद्राकडे प्रवेशित होण्यासाठी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातील सहयोगी प्राध्यापक, साहाय्यक प्राध्यापक व समन्वयक यांच्यासाठी शनिवारी (दि. १) आयोजित केलेल्या मार्गदर्शन वर्गामध्ये ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे. त्यासाठी नवोपक्रम, विविध कार्यशाळा, विविध तंत्रांचे आदान- प्रदान गरजेचे आहे. आजच्या काळास अनुसरून ई-कन्टेंट डेव्हलपमेंट, ऑनलाईन सिम, कोर्सचा दर्जा उंचावणे, विविध अभिनव उपक्रम या द्वारे भविष्यात वाटचाल करणे अपेक्षित आहे. स्थानिक गरजा ओळखून दूरशिक्षण केंद्राने अभ्यासक्रम सुरु करावेत.

### अभ्यासक्रमांचा स्वीकार करावा

**विद्यापीठाच्या नॅशनल रिसोर्स सेंटरशी समन्वय साधून सायबर लॉ सारखे कोर्स सुरु केले पाहिजेत. त्याचबरोबर भारतात दूरशिक्षण केंद्राद्वारे सेवा देणाऱ्या संस्थांकडील चांगल्या अभ्यासक्रमांचा स्वीकार केला पाहिजे, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.**

यावेळी माहिती कक्ष व समन्वयक, साहाय्यक प्राध्यापक यांच्यासाठीच्या बैठक व्यवस्था हॉल, महिला कक्षाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे आणि अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे उपस्थित होते. उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी स्वागत केले. डॉ. नितिन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. एन. तुरंबेकर यांनी आभार मानले.

# विद्यापीठात उद्यापासून आंतरराष्ट्रीय परिषद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात 'मटेरियल्स व पर्यावरण शास्त्र' या विषयावर शुक्रवारपासून (ता. ७) दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी दहा वाजता वि.स. खांडेकर भाषा भवन सभागृहात परिषदेचे उद्घाटन होईल. कॅनडाच्या लेकहेड विद्यापीठाच्या प्रा. ल्यू ख्रिस्तोफर यांचे यावेळी बीजभाषण होईल, अशी माहिती संयोजन समितीचे सचिव डॉ. मानसिंगराजे निंबाळकर व समन्वयक जे.बी. यादव यांनी दिली.

डॉ. निंबाळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि संशोधनाला जागतिकस्तरावर अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मटेरिअल सायन्स आणि पर्यावरणशास्त्र यांचा संयुक्त अभ्यास करण्याच्या आवश्यकतेमधून या परिषदेचे आयोजन केले आहे. सध्या मानवासमोर ऊर्जेच्या निर्मितीपासून ते प्रदूषणापर्यंतचे अनेक प्रश्न उभे



## 'मटेरियल्स व पर्यावरण शास्त्र'वर होणार चर्चा

आहेत. मानवी अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या या प्रश्नांना अभिनव व उपयुक्त तंत्रज्ञानाच्या, साधनांच्या निर्मितीमधून उत्तर शोधणे आवश्यक आहे. ही परिषद अशा नवतंत्रज्ञानाचा शोध घेणाऱ्या जगभरातील आंतरविद्याशाखीय संशोधक विद्यार्थी, शिक्षक, तंत्रज्ञ, तज्ज्ञ यांना एकाच व्यासपीठावर आणणार आहे. तैवान, बांगलादेश, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, नेपाळ, सौदी अरेबिया आणि कॅनडा आदी देशांतील सुमारे ३५० हून अधिक संशोधकांनी परिषदेसाठी ऑनलाईन नावनोंदणी केली आहे.